# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.५६५ दिनांक ०३/०७/२०२०

## तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्यास स्थानिक गुन्हे शाखा पालघर वसई युनिट यांना यश

दिनांक २८/०६/२०२० रोजी वेळी १८:०० वाजताचे पुर्वी नालासोपारा पुर्व चंदन नाका, झालावड पार्कसमोर मयत महिला सौ.नगीना आशिष यादव, वय ३२ वर्ष, रा. चंदन नाका, नालासोपारा पुर्व हिस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन अज्ञात हत्याराने गळा चिरुन, खुन करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत महेंद्र पिकप टेम्पो क्र.एम.एच.०४ डी.एस. ००९० यामध्ये प्लास्टीकच्या पांढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये टाकुन दिल्याने त्याबाबत पोलीस नाईक जितेंद्र बनसोडे, नेमणुक तुळींज पोलीस ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तुळींज पोलीस ठाणे गु.र.नं. I ६१५/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभिर्य पाहुन पोलीस अधीक्षक, पालघर यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे मिळालेल्या गुप्त माहितीवरुन आरोपीचा शोध घेऊन आरोपीत इसम नामे शिवा नगाराम चौधरी, वय ३० वर्ष, रा. मजेठिया पार्क, नालासोपारा पुर्व यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे नमुद गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्याने दिनांक २६/०६/२०२० रोजी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

सदरची कामगीरी श्री.दत्तात्रेय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.विजयकांत सागर, अपर पोलीय अधीक्षक वसई, श्री.अमोल मांडवे, उप विभा.पोलीस अधिकारी, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पालघर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र नाईक, स.पो.निरी. संतोष गुर्जर, स.पो.निरी. सुहास कांबळे, पो.हवा./जनार्दन मते, पो.हवा/संजय नवले, पो.हवा./विकास यादव, पो.ना./रमेश अलदर, पो.ना/प्रशांत पाटील पो.ना./मुकेश तटकरे, पो.ना/गोविंद केंद्रे, पो.ना/ शिवाजी पाटील, पो.ना/सागर बारवकर, पो.ना./अमोल तटकरे, पो.ना./प्रशांत ठाकूर, पो.ना/मनोज सकपाळ, पो.शि./शरद पाटील, पो.शि/अश्विन पाटील, पो.शि/अमोल कोरे यांनी पार केली आहे.